(२३)

**लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.), मुंबई यास सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाकरिता भागभांडवली अंशदान मंजूर करण्याबाबत.**

महाराष्ट्र **शासन,**
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय,क्रमांक:-एलएएस-२०१२/प्र.क्र.२९५/महामंडळे
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २० मार्च, २०१३.

वाचा :- १) शासन परिपत्रक,वित्त विभाग क्रमांक:अंदाज-२०.१२/प्र.क्र.६४/२०१२/ अर्थसंकल्प-३, दिनांक ६ जुलै,२०१२.
२) समक्रमांकाचा शासन निर्णय दिनांक २२.१०.२०१२.
३) शासन परिपत्रक,वित्त विभाग क्रमांक:अंदाज-२०.१२/प्र.क्र.६४/२०१२/ अर्थसंकल्प-३, दिनांक १४ जानेवारी, २०१३..

**शासन निर्णय :-** लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्या.मुंबई या शासन अंगीकृत उपक्रमाची स्थापना दिनांक ११ जुलै, १९८५ रोजी कंपनी अधिनियम, १९५६ अनुसार करण्यात आली आहे. या महामंडळामार्फत अनुसूचित जातीतील मातंग समाजातील व्यक्तींची आर्थिक उन्नती करण्यासाठी विविध योजना राबविण्यात येतात. या महामंडळाला भागभांडवलासाठी सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाकरीता रु.७५००.०० लाख (रुपये पंच्याहत्तर कोटी फक्त ) एवढी मंजूर करण्यात आली आहे. सदर तरतूदीपैकी संदर्भाधीन क्र.(२) वरील परिपत्रकानुसार ७५ % म्हणजेच रु.५६२५.०० लाख (रु. छप्पन कोटी पंचवीस लाख फक्त) एवढी तरतूद वितरीत करण्यात आली आहे. आता, संदर्भिय क्र.(३) येथील परिपत्रकानुसार उर्वरीत २५ टक्के तरतूदीतील मुळ तरतूदीच्या ५ टक्के म्हणजेच रुपये ३७५.०० लाख (रुपये तीन कोटी पंचाहत्तर लाख) वितरीत करण्यास शासन खालील अटी व शर्तीवर मान्यता देत आहे :-

i) महामंडळाने लाभार्थ्यांना अर्थसहाय्य मंजूर करण्याचे धोरण अशा प्रकारे निश्चित करावे जेणेकरुन भविष्यात लाभार्थ्यांकडून वसुलीच्या थकबाकीत वाढ होणार नाही.

ii) महामंडळाचे वार्षिक लेखे विधीमंडळास सादर करणे ही संविधानिक जबाबदारी आहे. त्यासाठी अपूरा कर्मचारी वर्ग हे कारण न देता महामंडळाचे वार्षिक लेखे विधीमंडळास ६ महिन्याच्या आंत सादर करण्याची कार्यवाही करावी.

iii) महामंडळाने वसूलीबाबत विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. कारण या वसूलीमधूनच नवीन लाभार्थ्यांना निधी उपलब्ध करुन घेता येईल. तसेच राष्ट्रीय उपक्रमांचे कर्ज देखील फेडता येईल. तरी महामंडळाच्या वसूलीचे अत्यल्प असलेले प्रमाण वाढविण्यासाठी ठोस उपाययोजना करुन त्याप्रमाणे प्रयत्न करावेत.

iv) थकबाकीच्या रकमा कालबध्द पध्दतीने वसुल करण्याबाबतची उपाययोजना/धोरण सुचविण्यात यावे.

v) महामंडळ राबवित असलेल्या योजनांची माहिती ( यावर्षी निश्चित केलेली उद्दीष्टे व साध्य झालेले लक्ष्य ) शासनाकडे सादर करावी.

vi) योजनेतर निधीतील खर्चासाठी शासनाने ठरविलेले निर्बंध काटेकोरपणे अंमलात आणावेत.

vii) कर्ज वसुलीमध्ये समाधानकारक प्रगती नसल्यास पुढील वर्षी भागभांडवल अशंदान वितरीत करण्यात येणार नाही याची महामंडळाने नोंद घ्यावी.

viii) महामंडळाने ऑन लाईन (on line) संगणक प्रणालीविकसीत करुन त्याची अंमलबजावणी करावी.

ix) वरील भागभांडवलातून जिल्हानिहाय निवासी उप जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली समितीमार्फत लॉटरी पध्दतीने कर्जाचे वाटप करावे.

x) सन २०११-२०१२ व सन २०१२-२०१३ मध्ये वाटप केलेल्या/करण्यात येणाऱ्या अर्जदारांची माहिती त्यांच्या जेष्ठता यादी क्रमांक त्यांच्या अर्जाच्या दिनांकासह शासनाच्या व महामंडळाच्या नोटीस बोर्ड व वेबसाईटवर टाकावी.

२. प्रस्तुत शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेली रक्कम अदा करण्यासाठी प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, कोकण विभाग, नवी मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, कोकण विभाग, नवी मुंबई यांनी सदरहू रक्कम म.को.नि.४४ मधील नमुन्यातील देयकान्वये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्यादित), मुंबई यांना अदा करावी. तसेच सदर देयकावर प्रतिस्वाक्षरी करण्याचे अधिकारही त्यांना किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-यांस देण्यात येत आहेत.

३. या बाबींवर होणारा खर्च पुढीलप्रमाणे नमूद केलेल्या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकावा व तो चालू आर्थिक वर्षाच्या मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा:-

४२२५ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांच्या कल्याणावरील भांडवली खर्च,
०१ अनुसूचित जातीचे कल्याण
१९० सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणूका, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, राज्य योजनांतर्गत योजना
(०१)(०१) लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळास भागभांडवली अंशदान ( मातंग उन्नती महामंडळ) (४२२५ ००२ २) (वि.घ.यो.)
५४ गुंतवणूका
मागणी **क्रमांक एन-४**

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक १७७/व्यय-१४,दि.५.३.२०१३ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**(शिरीष मोहोड)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, कोकण विभाग, नवी मुंबई (दोन प्रती)
व्यवस्थापकीय संचालक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ(मर्या.) मुंबई
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा) महाराष्ट्र १ / २, मुंबई/नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.